**छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅन करून अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

व्हर्जन १.० दि. १०ऑक्टोबर २०१८

ऑनलाईन रजिस्ट्रेशनकरीता अर्ज करण्यापूर्वी अर्जदारानी मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी अर्जदारानी आपले छायाचित्र व सही खालील पध्दतीने स्कॅन करावी व अपलोड करावी.

➢ **अर्जदाराचे छायाचित्र**

- समोरून काढलेले अलिकडील पासपोर्ट आकारातील रंगीत छायाचित्र काढावे. (बाजूने काढलेले छायाचित्र स्विकारले जाणार नाही)
- छायाचित्र रंगीत असावे , फिक्या रंगाच्या पार्श्वभुमीवर व शक्यतो पांढऱ्या अॅप्रनमधील असावे.
- टोपी आणि रंगीत चष्मे घालून काढलेले फोटो स्विकारले जाणार नाही. धार्मिक मस्तकावरण असले तरी चालेल परंतू कोणत्याही बाजूने चेहरा झाकलेला असू नये.
- आकार - शक्यतो २००x २३० pixels
- फाईलचा आकार २०केबी ते ५० केबी
- स्कॅन केलेल्या छायाचित्राच्या फाईलचा आकार ५० केबीपेक्षा अधिक असू नये. फाईलचा आकार त्यापेक्षा अधिक होत असल्यास स्कॅनिंग करताना स्कॅनरचे सेटींग बदलावे जसे डीपीआय रेसॉल्यूशन, कलर्स इ. व फाईल सेव्ह करावी.
- स्कॅन केलेले छायाचित्र जेपीईजी फॉरमॅटमध्ये असावे. (.jpg /.jpeg)

➢ **अर्जदाराची स्वाक्षरी**

- अर्जदाराने पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने सही करावी
- अर्जदाराने स्वतः सही करावी, त्याच्यावतीने अन्य कोणीही सही करू नये.
- सही पंजीकरणासाठीच्या अर्जावर /फॉर्म ८ व जेथे आवश्यक असेल तेथे वापरली जाईल.
- आकार - शक्यतो १४०x ६० pixels
- फाईलचा आकार १०केबी ते २० केबी
- स्कॅन केलेल्या सहीच्या फाईलचा आकार २०केबीपेक्षा अधिक असू नये.
- स्कॅन केलेली सही जेपीईजी फॉरमॅटमध्ये असावे. (.jpg /.jpeg)

➢ **छायाचित्र व सहीचे स्कॅनिंग करणे**

- स्कॅनरचे रेझोल्युशन कमीतकमी २००dpi (dots per inch)
- रंग -ट्रू कलर असावे

- फाईलचा आकार वर सांगितल्याप्रमाणे
- स्कॅन केलेले छायाचित्र व सही एडीटरच्या सहाय्याने फोटो व सहीच्या कडेने क्रॉप करून योग्य त्या आकारात प्रतिमा अपलोड करावी. इमेज फाईल .jpg /.jpeg फॉरमॅटमध्ये असावे. उदा. image01.jpg किंवा image01.jpeg इमेजचा आकार पाहण्यासाठी आयकॉनवर माऊस राईट क्लिक करावा.
- MS Windows/MS Office वापरणाऱ्या अर्जदाराना छायाचित्र व सही अनुक्रमे ५०केबी व २०केबीमध्ये MS Paint / MS Office चा वापर करून प्राप्त करून घेता येतील.
- Picture Manager : कोणत्याही फॉरमॅटमधील स्कॅन केलेले छायाचित्र व सही यामध्ये .jpg /.jpeg मध्ये छायाचित्र ५०केबी किंवा त्यापेक्षा कमी आकारात व सही २० केबी किंवा त्यापेक्षा कमी आकारात फाईल मेनूमधील सेव्ह ॲजचा वापर करून क्रॉप व रिसाईज करून प्राप्त करता येईल.
- फाईल दिलेल्या आकारात व प्रकारात उपलब्ध नसेल तर चूक आहे अशा अर्थाचा "एरर मेसेज" येईल.
- ऑनलाईल ॲप्लीकेशन फॉर्म भरताना अर्जदाराने आपली शैक्षणिक माहिती पूर्ण भरावी. भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी आणि proceed बटणावर क्लिक करावेण ऑन लाईन ॲप्लीकेशन फॉर्मच्या पुढील पानावर छायाचित्र व सही अपलोड करण्यासाठीची लिंक दिली जाईल.

➢ **छायाचित्र व सही अपलोड करण्यासाठीची कार्यपध्दती**

- छायाचित्र आणि सही अपलोड करण्यासाठी दोन स्वतंत्र लिंक दिल्या आहेत
- छायाचित्र /सही अपलोड करण्यासाठी त्या त्या लिंकवर क्लिक करावे.
- छायाचित्र /सही अपलोड केलेली फाईल जेथे सेव्ह झाली आहे ते पहा आणि लोकेशन निवडा.
- क्लिक करून फाईल निवडा.
- अपलोड बटणवर क्लिक करा.
- लक्षात ठेवा : जोपर्यन्त तुमची सही व छायाचित्र योग्य त्या आकारात अपलोड होत नाही तोपर्यन्त तुमचा ऑनलाईन अर्ज स्वीकृत होणार नाही.

➢ **<u>टिप</u>**

- जर अपलोड केलेले छायाचित्र किंवा सही स्पष्ट नसेंल तर अर्ज रद्द होऊ शकतो.
- अर्ज स्विकृत झाल्यानंतर अर्जदाराने त्याची छापील प्रत घ्यावी.
- अपलोड केलेले छायाचित्र किंवा सही स्पष्ट नसल्यास अर्जदार पुनश्च तो अर्ज एडीट करून छायाचित्र व सही अपलोड करू शकतो.